## <u>विशेष दरखास्त क्र. ०२/२०20 मधील निशाणी क्र. ५७ कडील अर्जावर</u>

## <u>आदेश</u>

१) प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित धनकोतर्फे न्यायनिर्णित ऋणको क्र. २ शफीक अ. गणी काझी यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. धनकोच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रस्तुतची दरखास्त प्रलंबीत असतांना न्यायनिर्णित ऋणको क्र. २ शफीक अ. गणी काझी हे दिनांक ०३/०२/२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयत शफीक अ. गणी काझी यांना प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणेचे वारस आहेत. प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, मयत न्यायनिर्णित ऋणको क्र. २ शफीक अ. गणी काझी यांचे या अर्जात नमुद केल्याप्रमाणेचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी द्यावी.

२) न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ तर्फे प्रस्तुत अर्जावर दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, दरखास्तदार यांनी मुदतीत वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. मात्र कामकाज लांबविण्यासाठी दरखास्तदार स्टेप्स घेण्यास उशीर करतात व त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा. न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ व्यतिरीक्त इतर ऋणको यांनी या अर्जास म्हणणे दिले नाही व त्यामुळे प्रस्तुत अर्ज इतर ऋणकोंच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत केला आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी न्यायनिर्णित धणकोला व त्यांच्या विद्वान वकीलांना वारंवार पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर न्यायनिर्णित धणकोतर्फे युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. प्रस्तुत अर्जाच्या कामी न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून

येते की, न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांनी प्रस्तुत अर्जावर दिलेल्या जबाबामध्ये न्यायनिर्णित ऋणको क्र. २ शफीक अ. गणी काझी यांना प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणेचे वारस असल्याचे नाकारले नाही.

५) न्यायनिर्णित धणको यांनी निशाणी क्र. ५९ कडील यादीसोबत दाखल केलेल्या शफीक अ. गणी काझी यांच्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, ते दिनांक ०३/०२/२०२५ रोजी मयत झाले आहेत.

६) मी दिवाणी प्रक्रीया संहिता क्रम २२ नियम १२ मधील तरतुदीचे अवलोकन केले. दि. प्र. संहिता क्रम २२ नियम १२ मधील नमुद तरतुदीनुसार सदर क्रम २२ मधील नियम ३, ४ व ८ मधील तरतुदी दरखास्त प्रकरणांना लागु पडत नाहीत. ज्या प्रकरणातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दरखास्त दाखल केली आहे त्या हुकूमनाम्याचे स्वरुप विचारात घेता व तसेच वरील नमुद कारणांचा विचार करता माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१) प्रस्तुत अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२) न्यायनिर्णित धनको यांनी प्रस्तुत अर्जात विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती दरखास्तीच्या टायटल क्लॉजमध्ये करावी व त्यानंतर दुरुस्त दरखास्तीची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.07.09 17:15:21 +0530

दिनांकः– ०९/०७/२०२५ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.